महाराष्ट्र टाईम्स – दि. १०/०२/२०१६

# कराडांचा उत्साह लाजविणारा : पुरंदरे

**पुणे** : 'डॉ. विश्वनाथ कराड शास्त्र आणि कलेचा संगम आहेत. त्यांच्या चेहऱ्यावरील उत्साह, प्रसन्नता आपल्यातील प्रत्येकाला प्रेरणा देऊन जाते. वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षीही त्यांचा उत्साह तरूणांना लाजवेल असा आहे,' असे गौरवोद्‌वार शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी काढले.

एमआयटीचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड यांच्या अमृतमहोत्सवी सत्कार सोहळयात ते बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, छत्रपती शाहू महाराज, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अरूण निगवेकर, सिम्बायोसिस विद्यापीठाचे संस्थापक–कुलपती डॉ. शां. ब. मुजूमदार, एमआयटीचे उपाध्यक्ष प्रा. राहूल कराड, सचिव व कार्यकारी संचालक प्रा. डॉ. मंगेश कराड, डॉ. सुनिल कराड आदी उपस्थित होते. 'अमृतमेघ' या गौरवग्रंथाचे प्रकाशनही या वेळी झाले.

'समता, मानवता प्रस्थापीत होईल, अशा प्रकारचे शिक्षण देण्यावर डॉ. कराड यांनी भर दिला आहे', या शब्दांत छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांच्या गौरव केला. डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणाले, की 'ज्ञान, कर्म आणि भक्तीचा संगम साधून डॉ. कराड यांनी सस्थेला पुढे नेले आहे. देशाच्या भविष्यातील युवक निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.' डॉ. मुजूमदार म्हणाले, की 'शिक्षणसंस्थांनी केवळ शिक्षण नाही, तर संस्कारही दिले पाहिजेत. हे ओळखून त्यांनी काम केले आहे'.